(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308


# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

**June -2020**

**ISSUE No-CCXXXV(235)**




Prof. Virag.S.Gawande
Chief Editor :
Director
Aadhar Social Research &,
Development Training Institute,
Amravati.

Dr. R.S.Satbhai
Executive Editor
Local Secretary
Adv.B.D.Hambarde Mahavidyalaya
Ashti

**Guest Editor**

Dr. S.R.Nimbore
Principal
Adv.B.D.Hambarde
Mahavidyalaya Ashti

Dr. Satish Kadam
President,AMIP&
Head,Dept of History
YCM,Tuljapur

Dr. Shivraj Bokade
Secretary,AMIP&
Head,Dept of History
YC,Nanded

**The Journal is indexed in:**
Scientific Journal Impact Factor (SJIF)
International Impact Factor Services (IIFS)

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

***Multidisciplinary International Research Journal***

**JUNE - 2020**

**ISSUE No – CCXXXV ( 235)**

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. R.S.Satbhai**
**Executive Editor**
**Local Secretary**
Adv.B.D.Hambarde Mahavidyalaya Ashti

**Guest Editor**

**Dr. S.R.Nimbore**
**Principal**
Adv.B.D.Hambarde Mahavidyalaya Ashti

**Dr. Satish Kadam**
**President,AMIP&**
Head,Dept of History
YCM,Tuljapur

**Dr. Shivraj Bokade**
**Secretary,AMIP&**
Head,Dept of History
Y.C,Nanded

**Aadhar International Publication**

© All rights reserved with the authors & publisher

# Editorial Board

**Chief Editor -**
**Prof.Virag S.Gawande,**
**Director,**
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. [M.S.] INDIA

**Executive-Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**
- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade**, Assistant Pro., Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,government College Of Education, Bhandara, Maharashtra
- **Dr. Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande**, Professor Dr. P. D. College of Law, Amravati

Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.

- **Executive Editor**

**Published by -**

- **Prof.Virag Gawande Aadhar Publication Amravati 444604**

**Email :** aadharpublication@gmail.com **Website :** www.aadharsocial.com **Mobile : 9595560278**

**© All rights reserved with the authors & publisher**

## INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Indian nation in the Booker-Winner Indo-Anglian Novelists — **Dr. Amit Yograj Kapoor** | 1 |
| 2 | Fiction of Indian Booker Prize Winners: A historical approach — **Dr. Abhay Shinde** | 7 |
| 3 | Online shopping ..Its opportunities and challenges. — **Mrs. Agrawal Nikita Kachrulal** | 9 |
| 4 | Dealing With Fifth Generation Wireless Technology for Mobile Cloud Computing — **Antima Bhimrao Shendge** | 13 |
| 5 | Arun Kolatkar: A Painter of Rustic Maharashtra — **Mr. Swapnil Alhat** | 20 |
| 6 | Multidisciplinary practices in Indian Modern Art — **Arun Bhagwan Suryawanshi** | 24 |
| 7 | Government Schemes and rural development — **Dr. Bhagwan Shankarrao Waghmare** | 28 |
| 8 | Women in Natural Resource Conservation — **Ku. Amrapali Eknath Bhiogade** | 32 |
| 9. | A Comparative study of poultry industry and Indian Economy — **Dr.Bhosle Vasant Keshav /Mr.Jadhav Ganesh Kantilal** | 38 |
| 10 | Dehvli Language and Culture Of Bhils — **Bhushan Arun Hirbhagat** | 43 |
| 11 | Political System in Ancient India - A Study with reference to Neeti Texts — **Dr. Bokare Tukaram Eknathrao** | 47 |
| 12 | Medieval monastery tradition and work of Rajur monastery — **Prof. Damre Shailja Shankarrao** | 52 |
| 13 | A Study of Perception of Farmers towards Organic Farming in Jabalpur district of Mahakaushal region of Madhya Pradesh — **Deepak Agrawal** | 55 |
| 14 | Diabetes — **Dr Kalpana Panditrao Korde** | 59 |
| 15 | Dalit Movement after Dr. Babasaheb Amebedkar in India: Challenges, problems & path forward — **Dr Mohini Kumari** | 64 |
| 16 | Indian Temples and the Erotic Sculptural Art — **Dr. R. R. Pimpalpalle** | 77 |
| 17 | Textile Industry in India — **Dr. Sarita Dinkarrao Deshmukh** | 85 |
| 18 | Digital Teaching-Learning: Impact On The Education System — **Dr. Alka Dahikar** | 88 |
| 19 | National Security and Climate Change — **Dr. Kiran Chakre** | 94 |

| | | |
|---|---|---|
| 104 | शोषणमुक्त, समतायुक्त व राष्ट्रनिष्ठ समाजनिर्मितीसाठी लढणारे महापुरुष - डॉ.बाबासाहेब आंबेडकर डॉ.संतोष सुधाकरराव कोटुरवार | 476 |
| 105 | तेर : प्राचीनातून नाशाकडे डॉ.विनोद बाबुराव बोरसे | 479 |
| 106 | प्राचीन मराठवाड्यातील (धर्मपूर) धर्मापूरी एक वैभवशाली नगर,बाजारपेठ आणि धार्मिक व सांस्कृतिक केंद्र डॉ.गंगथडे आर.डी. | 486 |
| 107 | देवगिरी किल्ला : मराठवाड्यतील ऐतिहासिक वारसा डॉ.केशव अंबादास लहाने | 489 |
| 108 | कोविड १९ महामारीतील आहाराचे आयोजन प्रा. डॉ. रश्मी प्रविण गजरे | 497 |
| 109 | महात्मा गांधीजीच्या रचनात्मक कार्याची कर्मभूमी — सेवाग्राम आश्रम डॉ.स्मिता म. जाधव | 501 |
| 110 | मराठवाड्यातील गढी/वाड्यातील: जलव्यवस्थापन *प्रा. डॉ. डी. एस. बिराजदार* | 508 |
| 111 | दारिद्रय निमूर्लनामध्ये सामाजिक सुरक्षा उपायांच्या भूमिकेबद्दल डॉ. अमर्त्य सेन यांचे विचार प्रा. चंद्रशेखर फरकाडे | 513 |
| 112 | हरिहरराव देशपांडे यांचे स्वातंत्र्यलढ्यतील योगदान प्रा.डॉ.गोविंद तिरमनवार | 519 |
| 113 | बदलत्या वातावरणामुळे हवामानातील झालेले परिणाम प्रा.डॉ.सोमनाथ गुंजकर | 527 |
| 114 | साहित्य आणि चित्रपट : विशेष संदर्भ — नारायण हरी आपटे. प्रा.हमीद उमरअली काझी | 526 |
| 115 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार डॉ.जाधव राजेश्री अप्पाराव | 532 |
| 116 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक कार्य प्रा. जयंत विरुळकर | 537 |
| 117 | महात्मा गांधीजींच्या चळवळीतील मागण्यांचा स्वातंत्र्य चळवळीवर प्रभाव : एक अभ्यास प्रा. जयवंत नथ्थूजी काकडे | 543 |
| 118 | कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य श्री. अजितकुमार भिमराव पाटील | 548 |
| 119 | भारतीय स्वातंत्र्य लढयात चंद्रपुरचे सिंह खुशालचंद खजांची यांचे योगदान प्रा.डॉ.कैलास रामचंद्र भांडारकर | 552 |
| 120 | चार्वाक दर्शन : एक विचारप्रवाह डॉ. किरण शिवाजीराव पाईकराव | 556 |
| 121 | उस्मानाबाद तालुक्यातील गोरक्षणदर्शक वीरगळ : समकालीन शेतीप्रधान समाजव्यवस्थेचे निदर्शक प्रा.डॉ.कुलकर्णी जयश्री रमेश | 560 |
| 122 | हैद्राबाद मुक्तिसंग्रामात सोलापूरच्या आर्य समाजाने दिलेला ऐतिहासिक लढा प्रा. लक्ष्मी मधुकर रेड्डी | 566 |
| 123 | चिनी बौद्ध प्रवासी — चर्चा आणि चिकित्सा प्रा. डॉ. माधवी खरात | 571 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Issue No,235
ISSN : 2278-9308
June 2020

# हरिहरराव देशपांडे यांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान

प्रा.डॉ.गोविंद तिरमनवार

सहयोगी प्राध्यापक इतिहास,स्व.दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय नांदगाव पेठ

ता.जि.अमरावती

भारतीय स्वातंत्र्यासाठी देशातील विविध भागातील असंख्य देशभक्तांनी सर्वस्वाचे बलिदान दिले. तत्कालिन मध्यप्रांत वऱ्हाडातील अमरावती शहरही स्वातंत्र्य आंदोलनात मागे नव्हते.एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या सुरवातीला या शहरात ब्रिटीशविरोधी राजकीय चळवळी सुरू झाल्या.या काळात अमरावतीचे नेतृत्व सर्वश्री.दादासाहेब खापर्डे,सर मोरोपंत जोशी,रावबहादूर रंगनाथ मुधोळकर इत्यादी उच्च मध्यमवर्गातील इंग्रजी विद्याविभूषित वकील मंडळीनी केले.गांधीयुगातील असहकार चळवळ ,सविनय कायदेभंग चळवळ आणि चलेजाव चळवळ या तीनही स्वातंत्र्य चळवळीत अमरावती शहर सक्रिय होते.याकाळात वीर वामनराव जोशी,भाऊसाहेब असनारे,डॉ.शिवाजीराव पटवर्धन,सौ.पार्वतीबाई पटवर्धन,नानासाहेब बामणगावकर,हरिहरराव देशपांडे या त्यागनिष्ठांनी शहरातील स्वातंत्र्य चळवळींचे नेतृत्व केले.

देशभक्त हरिहरराव देशपांडे हे विदर्भातील जुन्या पिढीतील आघाडीचे राष्ट्रीय कार्यकर्ते व स्वातंत्र्यसैनिक होते. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या कार्यकर्त्यांमधून निर्माण झालेल्या असंख्य स्वातंत्र्यसैनिकांमध्ये हरिहरराव देशपांडे हे प्रमुख होते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्यांनी वेळोवेळी राष्ट्रीय आंदोलनात सक्रिय सहभाग घेऊन वारंवार तुरूंगवास भोगला.

हरिहरराव देशपांडे यांचा जन्म ५ मार्च १९०५ रोजी झाला. अमरावती ही हरिहररावांची कर्मभूमी. या देशभक्ताचे जीवन संघर्षाने भरलेले होते. नागपूर येथे १९२० साली भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात त्यांनी आयुष्य देशकार्याला वाहण्याची शपथ घेतली. यावेळी त्यांचे वय केवळ १५ वर्षांचे होते. वयाच्या १५ व्या वर्षी देशसेवेची घेतलेली शपथ हरिहररावांनी शेवटपर्यंत मोडली नाही. अमरावतीला वीर वामनराव जोशी यांच्या नेतृत्वाखाली १९२० च्या असहकारितेच्या आंदोलनात ज्या बाराशे विद्यार्थ्यांनी इंग्रजी शिक्षणावर बहिष्कार टाकण्यासाठी शाळा सोडल्या त्यात हरिहरराव हे प्रमुख होते. त्यांनी पुढील सर्व शिक्षण राष्ट्रीय शाळांमधून व संस्थामधून पूर्ण केले. अमळनेरच्या राष्ट्रीय शाळेतून शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर पुण्याच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठात महाविद्यालयीन शिक्षण घेऊन १९२५ मध्ये वाङ्मय विशारद ही पदवी त्यांनी प्राप्त केली.1

हरिहरराव हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे एक प्रमुख आधारस्तंभ होते. हरिहररावांचा संस्कृत, इतिहास या विषयांसोबतच भारतीय व्यायाम पध्दतीचा अभ्यासही दांडगा होता. मराठीप्रमाणे संस्कृत, हिंदी व इंग्रजी या भाषांवर चांगले प्रभुत्व होते. वक्तृत्वाची हातोटी होती. त्यामुळे मंडळाच्या वतीने राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरांवर प्रचाराचे कार्य बहुतेक वेळा हरिहरराव देशपांडे यांच्यावर सोपविले जाई. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे संस्थापक श्री. अंबादासपंत वैद्य यांची स्वातंत्र्यलढ्यातील भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. पडद्याआड राहून अंबादासपंत वैद्य यांनी मंडळाच्या कार्यकर्त्यांना स्वातंत्र्यलढ्यात भाग

घेण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन दिले. कार्यकर्त्यांना योग्य दिशा दाखविली. वेळोवेळी उत्तम मार्गदर्शन केले. त्यामुळे मंडळाचे अनेक कार्यकर्ते स्वातंत्र्यलढ्यात अग्रेसर होते. मंडळाच्या प्रमुख कार्यकर्त्यांपैकी हरिहरराव देशपांडे एक होते. अंबादासपंतांची स्वातंत्र्यलढ्यातील भूमिका हरिहररावांनी स्वत: धडाडीचे उघड कार्य करून व्यक्त केली. त्यांनी मंडळाच्या वतीने स्वातंत्र्यलढ्यात एक मोठी जबाबदारी पार पाडली.

हरिहरराव देशपांडे यांच्या भारतीय व्यायाम पध्दतीच्या प्रचाराचे कार्य पाहून पंडित मदनमोहन मालवीय यांनी हरिहररावांना उत्तरप्रदेशात पाचारण केले. हरिहररावांनी संपूर्ण उत्तरप्रदेशाचा दौरा करून तेथे अनेक शिबिरे चालविली व कॉंग्रेसच्या स्वयंसेवकांना व कार्यकर्त्यांना भारतीय व्यायाम पध्दतीचे शिक्षण दिले. याच काळात भारताचे भूतपूर्व पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा सहवास हरिहररावांना घडला. 2

उत्तर प्रदेशातील कामगिरी आटोपल्यावर हरिहरराव विदर्भ प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस नेमले गेले. १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत हरिहरराव सक्रिय होते.त्यांनी वडनेरा ,वलगाव,खारतळेगाव,साऊर,शिराळा,नांदगाव,भातकुली,खोलापूर व वाठोडा या गावात दौरे करून आंदोलनाचा प्रचार केला.3 जिल्हा युध्दमंडळाचे प्रचारमंत्री म्हणून हरिहररावांनी जिल्ह्यात शेकडो ठिकाणी व्याख्याने देऊन सारी जनता जागुत केली त्यामुळे चिडून जाऊन ब्रिटीश सरकारने त्यांना पकडले आणि एक वर्षाची शिक्षा दिली.मध्यप्रदेशातील शिवनी तुरूंगात हरिहररावांना एक वर्षाची सक्तमजुरीची-शिक्षा भोगावी लागली.4 तुरूंगवासादरम्यान याच तुरूंगात स्थानबध्द असलेले शरदचंद्र बोस व सुभाषचंद्र बोस यांच्याशी त्यांचा घनिष्ठ संबंध आला. १९३९ च्या त्रिपुरी कॉंग्रेससाठी स्वयंसेवक दल संघटित करून त्यांना पध्दतशीर शिक्षण देण्याची जबाबदारी हरिहररावांवरच येऊन पडली. ही जबाबदारी त्यांनी उत्तमपणे पार पाडली. त्यांच्या या कार्याची प्रशंसा पंडित नेहरू आणि सुभाषबाबूंनी मुक्त कंठाने केली.

इ.स. १९४० मध्ये श्री. पु. य. देशपांडे यांनी जे 'भवितव्य' साप्ताहिक काढले. त्याच्या प्रकाशनात व संपादनात हरिहररावांचा प्रमुख वाटा होता. या साप्ताहिकातून दुसर्या महायुध्दाचा आढावा घेणारे 'संजय उवाच' हे सदर हरिहरराव लिहीत. ते सदर इतके लोकप्रिय ठरले की, ठिकठिकाणी त्याचे सामुदायिक वाचन होत असे. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात हरिहरराव सक्रिय होते. आंदोलनातील सर्व भूमिगत नेत्यांशी त्यांचे संबंध असून या आंदोलनाची सूत्रे हलविण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. यावेळीही त्यांना तुरूंगवास भोगावा लागला.5

स्वातंत्र्यलढ्यात महत्वाचे योगदान देणार्या हरिहररावांनी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या कार्याकडे पूर्ण लक्ष दिले. मंडळाला त्यांनी आपले जीवितकार्य मानले. सतत आठ वर्ष मंडळाचे सरचिटणीस राहून त्यांनी प्रशंसनीय कामगिरी बजाविली. १९४६ मध्ये मंडळाच्या वतीने अमरावतीत पहिली 'अखिल भारतीय शारीरिक शिक्षण परिषद' भरविण्यात आली. या परिषदेत निर्माण झालेल्या 'शारीरिक शिक्षण मंडळाचे' पहिले सरचिटणीस म्हणून हरिहररावांची निवड झाली.

शारीरिक शिक्षणाच्या क्षेत्रात हरिहररावांनी अत्यंत मोलाची कामगिरी केली. त्यांची भरीव कामगिरी लक्षात घेऊन केंद्र सरकारने शारीरिक शिक्षण सल्लागार मंडळावर त्यांची नेमणूक केली. १९४३ मध्ये मध्यप्रदेश सरकारने उभारलेल्या 'गृहरक्षक दलाच्या' प्रमुख संघटक व प्रचारकपदी मुख्यमंत्री रविशंकर शुक्ल यांनी हरिहरराव देशपांडे यांची निवड केली. रझाकारांच्या धुमाकुळीला पायबंद घालण्याच्या उद्देशाने या दलाची स्थापना करण्यात आली होती. हरिहररावांनी अत्यंत परिश्रमपूर्वक सीमावर्ती भागात गृहरक्षकांचे जाळे विणले व रझाकारांना चांगलीच दहशत बसविली.

भारतीय व्यायाम पध्दतीचा दांडगा अभ्यास असलेल्या हरिहररावांनी जगात भारतीय व्यायाम पध्दतीचा प्रसार केला. १९४९ मध्ये भारतीय व्यायाम पध्दतीचे प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी मंडळाची चमू लिंगियाड येथे गेली होती. त्या चमूचे प्रतिनिधित्व हरिहररावांनीच केले होते. त्या ठिकाणी भारतीय चमूने करून दाखविलेली प्रात्यक्षिके देशोदेशींच्या प्रतिनिधींना इतकी आवडली की, या चमूला केवळ प्रात्यक्षिके दाखविण्यासाठी अनेक देशांनी निमंत्रणे दिली. स्वीडनमधील स्कॉटहोम येथील १९४९ च्या जागतिक शारीरिक शिक्षण परिषदेत भारतीय प्रव्नते म्हणून हरिहरराव उपस्थित होते. 6

स्वातंत्र्य सैनिक व व्यायामतज्ज्ञ हरिहरराव एक प्रभावी लेखक होते. तुरूंगात असतानाच त्यांनी 'राजपूत संस्कृती' व 'राजपूत राज्याचा उदय व -हास' ही पुस्तके लिहली. याशिवाय 'दोन प्रख्यात युध्द तंत्रे' , '१८५७ च्या वीर महिला' , 'अवनतिमय भारतवर्ष' , 'शीखांचा इतिहास' आणि 'यावलीचा स्वातंत्र्यसंग्राम' या महत्त्वपूर्ण ग्रंथांचे लेखनही हरिहररावांनी केले. तसेच अनेक वृत्तपत्रात विविध विषयांवर लेखन केले. 7

विविध क्षेत्रात मोलाची कामगिरी वजावलेल्या हरिहररावांचा मृत्यू वयाच्या ६० व्या वर्षी २० एप्रिल १९६५ रोजी झाला. स्वातंत्र्य सैनिक, व्यायामतज्ज्ञ, उत्कृष्ट वक्ते आणि प्रभावी लेखक असलेल्या हरिहरराव देशपांडे यांचे कार्य सदैव भारतीयांच्या स्मरणात राहील असेच आहे. देशाच्या स्वातंञ्यासाठी हरिहरराव देशपांडे यांनी केलेले कार्य मोलाचे आहे .निस्वार्थ भावनेने देशस्वातंञ्यासाठी महत्वाचे योगदान देणारे हरिहरराव खरे देशभक्त होते.

संदर्भ :-

1) गोविंद तिरमनवार (संपा.),स्वातंञ्यपूर्व काळातील अमरावतीची गौरवगाथा,आझाद हिंद मंडळ ,बुधवारा अमरावती,2015,पा..37

2) कित्ता पा.38

3) भि.दे.कारंजकर,अमरावती शहराचा इतिहास,भाग 1 व 2,अमरावती महानगरपालिका शताब्दी ग्रंथ,1978 पा.636

4) कित्ता पा.644

5) वा.बा.खापर्डे (संपा),अमरावती शहराचा इतिहास,भाग-3,अमरावती महानगरपालिका,2001,पा.309

6) गोविंद तिरमनवार (संपा.),उपरोक्त पा.38

7) कित्ता पा.39